# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. सर्वसाधारण सभा दिनांक १४/०९/२०१५

## सायं ४.०० वा.

<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>विषयाचे नाव</th><th>मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय</th></tr>
<tr><td>१</td><td>मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/०८/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.</td><td>मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/०८/२०१५ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक - रमेश घोरकना सुचक - सुदेश चौधरी<br>ठराव सर्वानुमते मंजुर</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रश्नोत्तरे</td><td>
<table>
<tr><td>१</td><td>१४/९/२०१५</td><td>श्री. किरण पुरुषोत्तम भोईर</td><td>आचोळे स.नं. २५४, हि.नं. ३ व इतर ७ सर्व्हे क्रमांकाचे जमिनीवरील बांधकामास नगररचना विभागाने परवानगी दिली आहे काय? असल्यास कागदपत्रांच्या प्रती</td><td>मा. उपसंचालक, नगररचना</td></tr>
<tr><td>२</td><td>१४/९/२०१५</td><td>मा. श्री. धनंजय गावडे</td><td>वसई- विरार महानगरपालिका हद्दित किती खदाणी आहेत. उत्खननासाठी परवाना दिला नसल्यास काय कार्यवाही केली? खदाणीत ३ अल्पवयीन मुलांच्या मृत्यु प्रकरणी महानगरपालिकेने खाणमालकाची चौकशी केली काय?</td><td>मा. उपसंचालक, नगररचना</td></tr>
<tr><td>३</td><td>१४/९/२०१५</td><td>मा. श्री. धनंजय गावडे</td><td>नवघर माणिकपुर कार्यालयात दि. २०/०३/२०१५ रोजी रात्री ११.०० वाजता गुप्त बैठकीत कंत्राटदारांनी चिठ्ठी टाकून निविदा घेतल्या होत्या काय? ओसवालनगरी येथील ९० फुट रस्त्याच्या मधोमध डि.पी. रस्त्यावरील अनधिकृत गाळ्याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती तसेच तुळींज स.नं. ९५/७ येथे जाधव नामक मार्केट बांधकामास परवानगी घेतली होती काय? नसल्यास MRTP अंतर्गत काय कार्यवाही केली? गुन्हे दाखल केले काय? याबाबत मा. उच्च न्यायालयाचे जनहित याचिका क्रमांक ८४/२०१५ अन्वये काही आदेश दिले असल्यास त्याबाबत माहिती</td><td>मा. उपसंचालक, नगररचना, मा. कार्यकारी अभियंतामाचेवाड ,मा.सहाय्यक आयुक्त नवघर (ड),मा. सहाय्यक आयुक्त (क)</td></tr>
<tr><td>४</td><td>१४/९/२०१५</td><td>मा. श्री. स्वप्निल बांदेकर</td><td>मौजे बोळींज स.नं. ३७० मधील आरक्षण क्रमांक १६७ चे स्वरुप, या आरक्षित जमिनीवर बांधकामास परवानगी दिली आहे काय ? तसेच स.क्र. ३७० मधील आरक्षण क्र. १६७ हे कोणत्या नियमानुसार हलविण्यांत आले?</td><td>मा. उपसंचालक, नगररचना</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>
<table>
<tr>
<td>५</td>
<td>१४/९/२०१५</td>
<td>मा. श्री. स्वप्निल बांदेकर</td>
<td>नवघर माणिकपुर कार्यालयात दि. २०/०३/२०१५ रोजी रात्री ११.०० वाजता गुप्त बैठकीत कंत्राटदारांनी चिठ्ठी टाकून निविदा घेतल्या होत्या काय? ओसवालनगरी येथील ९० फुट रस्त्याच्या मधोमध डि.पी. रस्त्यावरील अनधिकृत गाळ्याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती तसेच तुळींज स.नं. ९५/७ येथे जाधव नामक मार्केट बांधकामास परवानगी घेतली होती काय? नसल्यास MRTP अंतर्गत काय कार्यवाही केली? गुन्हे दाखल केले काय? याबाबत मा. उच्च न्यायालयाचे जनहित याचिका क्रमांक ८४/२०१५ अन्वये काही आदेश दिले असल्यास त्याबाबत माहिती</td>
<td>मा. उपसंचालक, नगररचना, मा. कार्यकारी अभियंतामाचेवाड ,मा. सहाय्यक आयुक्त नवघर (ड),मा. सहाय्यक आयुक्त (क)</td>
</tr>
</table>
अनुमोदक - प्रविण शेट्टी सुचक - पंकज ठाकूर<br>
ठराव सर्वांनुमते मंजुर
</td>
</tr>
<tr>
<td>३</td>
<td>शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव</td>
<td>१ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ (शासन निर्णय) दि. ०४/०९/२०१५<br>
२ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ (शासन निर्णय) दि. ०४/०९/२०१५<br>
अनुमोदक - कन्हैय्या भोईर सुचक - चंद्रकांत गोरिवले<br>
ठराव सर्वांनुमते मंजुर</td>
</tr>
<tr>
<td>४</td>
<td>अग्निशमन विभागाकरीता अद्ययावत यंत्रसामग्री व उपकरणांसह सात (७) टु व्हिलर वाहने खरेदी करणेबाबत.</td>
<td>ठराव / निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकरीता अद्ययावत यंत्रसामग्री व उपकरणांसह सात (७) टु व्हिलर वाहने खरेदी करणे करीता अंदाजित रक्कम रु. ४९,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणपन्नास लाख रुपये) पर्यंतच्या अपेक्षित खर्चास आजची सर्व साधारण सभा प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान करीत असून याकामी वृत्तपत्रात जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अनुषांगिक सर्व खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देणेत येत आहे.<br>
अनुमोदक - रुपेश जाधव सुचक - फ्रान्सिस डॉमनिक डिसोजा<br>
ठराव सर्वांनुमते मंजुर</td>
</tr>
<tr>
<td>५</td>
<td>अग्निशमन दलासाठी ७० मीटर किंवा ९० मीटर उंचीचे एरियल लॅडर / हायड्रोलिक प्लॅटफॉर्म वाहन अद्ययावत यंत्रसामग्री व उपकरणांसह खरेदी करणेबाबत.</td>
<td><u>ठराव/निर्णय:-</u> सदर वाहन खरेदी करणे करीता अंदाजित रक्कम रुपये २०,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये वीस कोटी रुपये ) एवढा खर्च अपेक्षित आहे. अग्निशमन दलासाठी ७० मीटर किंवा ९० मिटर उंचीचे एरियल लॅडर/ हायड्रोलिक प्लॅटफॉर्म वाहन अद्ययावत यंत्रसामग्री व उपकरणांसह खरेदी करणे करीता अंदाजे रक्कम रु.२०,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये वीस कोटी रुपये मात्र) एवढया खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी घेणे व ई-निविदा पध्दतीने खरेदी करण्याच्या वरील प्रस्तावास आजची सर्वसाधारण सभा बहुमताने आर्थिक व प्रशासकीय मंजुरी प्रदान करीत आहे.<br>
प्रस्तावाच्या बाजूने - १०८ प्रस्तावाच्या विरोधात - ५ तटस्थ - ०<br>
अनुमोदक - नितिन राऊत सुचक - पंकज ठाकूर<br>
ठराव बहुमताने मंजुर</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| ६ | **भारतीय सैन्यातील माजी सैनिकांसाठी प्रभाग 'ड' नवघर येथील वाचनालय इमारतीत जागा उपलब्ध करून देणेबाबत.** | **निर्णय :-** वरील प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. भारतीय सैन्य दलातील माजी सैनिकासाठी व त्याच्या कुंटुबियासाठी आरोग्य विषयक चिकित्सा व उपचार करण्यासाठी तात्कालीन प्रभाग समिती ड येथील वाचनालय इमारतीमध्ये जागा उपलब्ध करुन देण्यास याद्वारे मंजुरी देण्यात येत असुन तद् अनुषंगिक सर्व बाबींची पुर्तता व कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यांत येत आहे.<br>अनुमोदक - निलेश देशमुख सुचक - चंद्रकांत गोरिवले<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ७ | **सतमेव्हिलेज तलावातुन गरजेवेळी कार्डीनल ग्रेशियस मेमोरीअल हॉस्पिटल ट्रस्ट यांना पाणी देणेबाबत निर्णय घेणे.** | **ठराव / निर्णय :-** सदर विषयी सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, कार्डीनल ग्रेशियस मेमोरीयल हॉस्पीटलला महापालिका मालकीच्या सतमेव्हिलेज तलावातून हॉस्पीटलच्या खर्चानेच गरजेनुसार पाणी उचलण्यास परवानगी देण्यात येत आहे. सदर पाण्याचे मुल्य नियमानुसार तसेच आवश्यक अटी शर्तीचा करारनामा करण्यास व याबाबत पुढील सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना प्रदान करण्यांत येत आहेत.<br>अनुमोदक - रुपेश जाधव सुचक - फ्रान्सिस डॉमनिक डिसोजा<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ८ | **सन २०१५-१६ या वर्षात महानगरपालिकेमार्फत राबविण्यांत येणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता अहिल्याबाई होळकर धर्तीवर मासिक पास योजनेकरीता आर्थिक वाढीव तरतुद मंजुरीबाबत.** | **निर्णय :-** सदर योजना चांगली असून शालेय मुलांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ व्हावा या दृष्टीने उर्वरित विविध शालेच्या मागणी नुसार येणा-या विदयार्थ्यांना बस पास वाटप करण्यात यावे.या करिता महिला व बालकल्याण विभागाने मागणी केल्यानुसार शालेय मुलांसाठी विविध उपक्रम या लेखाशिर्षकामधून ५०,००,०००/- वाढीव तरतुद उपलब्ध करुन देण्यात यावी. या करिता येणा-या अदांजे ५०,००,०००/- रु. वाढीव खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे .<br>अनुमोदक - फ्रान्सिस डॉमनिक डिसोजा सुचक - पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ९ | **वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात विरार (पू.) विरार (प.) व वसई रोड प. येथील मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने बांधलेले स्कायवॉक हस्तांतरण करून घेणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विरार (पू.), विरार (प.) व वसई रोड (प.) येथील मुंबई महानगर प्रादेशीक विकास प्राधिकरणाने बांधलेले तीन स्कायवॉक हस्तांतर करुन घेण्यास तसेच सदर स्कायवॉकवर जाहिरातीच्या माध्यमातून येणा-या उत्पन्नापैकी ५० % रक्कम महापालिकेने मुंबई महानगर प्रादेशीक विकास प्राधिकरणास स्कायवॉकपोटी आलेल्या खर्चाच्या मोबदल्याचा काही भाग म्हणून देणेबाबत हि सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - पंकज ठाकूर सुचक - भारती देशमुख<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १० | **वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दितील मौजे नारिंगी येथे रेल्वे उड्डाणपुल बांधकाम करणेकामी मंजुर विकास आराखड्यातील D.P. रस्त्याच्या संरेखनामध्ये बदल करण्यासाठी महाराष्ट्र** | **ठराव/निर्णय :-** वरील प्रस्तावानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे-नारिंगी येथे रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी प्रस्तावीत रेल्वे उड्डानपुल मंजूर विकास आराखडयातील ३० मी. रुंदीच्या D.P रस्त्याला जोडण्याकरिता सदर D.P रस्त्याच्या संरेखनामध्ये बदल करणेंस (सदर रस्त्याची मंजूर विकास आराखडयानुसार आखणी रद्द करुन नविन आखणी प्रमाणे) व सदर रस्ता (नकाशा क्र.VVCMC/MOD No.३/२०१४-१५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) मंजूर विकास आराखडयामध्ये |

| | | |
|---|---|---|
| | **प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेबाबत.** | अंतर्भूत करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - महेश पाटील सुचक - भरत मकवाना<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ११ | **महापालिका क्षेत्रात वनहक्क क्षेत्रातील दाव्यावर कारवाई करण्यासाठी उपविभाग समितीवर प्रभागनिहाय अशासकीय सदस्य म्हणुन तीन सदस्यांची नेमणुक करणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** उपरोक्त प्रस्ताव व मा. भारत सरकार आदिवासी विभाग, मंत्रालय यांचेकडील पत्र क्र.१९०२०/०२/२०१२-FRA(Vol.II) Dt.०५/०३/२०१५ मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडील पत्र क्र.महसूल/टेनन्सी/वनहक्क/कावि १६५/१५ दि.२१/०८/२०१५ पत्रानुसार वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील वनहक्क दावेदार असलेल्या प्रभाग समिती क्षेत्रात असलेल्या दाव्यांवर कार्यवाही करणेसाठी उपविभागीय समितीवर प्रभागनिहाय शासकीय सदस्य म्हणून तीन सदस्यांची नेमणूक करणे आवश्यक आहे व त्यामध्ये दोन अनुसूचित जमातीतील सदस्य व एक महिला सदस्य असणे आवश्यक आहे.<br>सदर प्रकरणी तीन सदस्यांची नेमणूक करणेबाबत मा.महापौर महोदयांना ही सभा सर्वानुमते अधिकार प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - उजमा पीरखान सुचक - प्रज्ञा देसाई<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १२ | **लोकसहभागातुन नागरी क्षेत्रातील वनांचे संरक्षण व व्यवस्थापन करणेकामी सर्वसाधारण समिती कार्यकारी समिती स्थापन करणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** उपरोक्त प्रस्ताव महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र.एफडीएम-२०११/प्र.क्र.१०० (भाग २)/फ.२ दिनांक ०४/०८/२०१५ नुसार लोकसहभागातून नागरी क्षेत्रातील वनांचे संरक्षण व व्यवस्थापन करणे आवश्यक असून या कामी शासन निर्णयानुसार सर्वसाधारण समिती व कार्यकारी समिती स्थापन करणे आवश्यक आहे.<br>सदर प्रकरणी नमूद शासन निर्णयानुसार सर्वसाधारण समिती व कार्यकारी समिती स्थापन करणेबाबत मा. महापौर महोदयांना ही सभा सर्वानुमते अधिकार प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - नरेंद्र पाटील सुचक - सुदेश चौधरी<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १३ | **सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दितील उद्याने, सर्कल, डिव्हाईडर इत्यादी कामाकरीता लाल माती, मुरुम, बारीक, वाळू व शेणखत खरेदीकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.** | ठराव/निर्णय:- उपरोक्त नमूद प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. वसई - विरार शहर महानगरपालिका संपूर्ण क्षेत्रात उद्यानांसाठी सर्कल, डिव्हाईडर तसेच शालेय क्रिडा महोत्सवासाठी मैदाने लेव्हल करण्यासाठी लाल माती, बारीक वाळू व शेणखत खरेदी करण्यासाठी जाहीर ई-निविदा प्रसिध्द करुन ठेकेदाराकडून प्रती ब्रासप्रमाणे दर मागविणेस व अनुषंगिक खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - संजय पिंगुळकर सुचक - सुदेश चौधरी<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १४ | **वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी** | निर्णय:- तरी शहरातील विविध ठिकाणी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे कामासाठी तांत्रीक सल्लागार नेमणूक करण्यांस व पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या वरील ठिकाणांवर तसेच इत्यादी महत्त्वाचे ठिकाणी व वेळोवेळी |

| | | |
|---|---|---|
| | **सी.सी.टि.व्ही. व्यवस्था करणेबाबत.** | मा.नगरसेवकांचे सूचनेप्रमाणे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यांस, कार्यान्वीत करणे तसेच त्यांची देखभाल दुरुस्ती करण्यांस रक्कम रु.९ कोटी पर्यंतचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - अब्दुल पटेल सुचक - पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १५ | **शहरी बेघरांना निवारा (Scheme of Shelter for Urban Homeless) या उपांगा अंतर्गत बेघरांसाठी निवारा केंद्र बांधणेसाठी होणाऱ्या खर्चाबाबत.** | **ठरावाचा निर्णय :** वरील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन बेघरांसाठी निवारा केंद्र बांधकाम झाल्यावर ५ वर्षासाठी देखभाल खर्च व त्या अनुषंगिक होणारा खर्च राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत करण्यात येणार असून त्या पुढील ५ वर्षानंतर शासनाकडून निधी अप्राप्त झाल्यास ५ वर्षानंतरही निवारा केंद्र संबंधित व त्या अनुषंगिक होणारा खर्च महानगरपालिकेच्या फंडातून करण्याकामी आजची मा. सर्वसाधारण सभा प्रशासकीय व वित्तिय मान्यता एकमताने प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - प्रशांत राऊत सुचक - प्रज्ञा देसाई<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १६ | **वसई-विरार शहर महानगरपालिकेचा सन २०१४-१५ या वर्षाचा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल सादर करणेबाबत.** | **ठरावाचा निर्णय :** उपरोक्त प्रस्तावानुसार सर्वसन्मानीय सदस्य यांना सिडी (C.D) स्वरुपात अहवाल उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सदर अहवालात नमुद बाबींवर महानगरपालिकेने पर्यावरण संवर्धनासाठी व्यापक योजना कराव्यात तसेच त्या अनुषंगाने सर्व कार्यवाही करणेस ही सभा बहुमताने प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करीत आहे.<br>**प्रस्तावाच्या बाजुने - १०८ प्रस्तावाच्या विरोधात - ५ तटस्थ - ०**<br>अनुमोदक - पंकज चोरघे सुचक - सुनिल आचोळकर<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १७ | **स्थानिक निधी लेखा परिक्षा संचालनालय (मनपालेप) नवी मुंबई यांचेकडून प्राप्त झालेला लेखा परिक्षण अहवाल सन २०१२-१३ त्यावरील अनुपालनासह मा. महासभेपुढे मांडणे.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** स्थानिक निधी लेखा परिक्षा संचालनालय (मनपालेप), नवि मुंबई यांनी केलेल्या सन २०१२-१३ या वित्तीय वर्षातील लेखा परिक्षण अहवालामध्ये समाविष्ट असलेल्या आक्षेपांचे अनुपालन संबंधित विभागांकडून प्राप्त झाले असुन सदरील अनुपालन अहवाल या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करुन स्थानिक निधी लेखा परिक्षा संचालनालय विभागास पाठवणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - प्रशांत राऊत सुचक - प्रकाश रॉड्रीक्स<br>ठराव सर्वानुमते मंजुर |